यांची

बँकांचे
बँकांचे
मालाचे
ऱ्यांना हे
यातच
त्यांकडे
नल्याचा

च्या
अर्बन
धनादेश
व इतर
काहींनी
येथील
धनादेश
त्यांच्या
शेतकरी
ाले की
काम्या
आहे.



रताना



नाशिक : संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, गिरीश महाजन, सीमा हिरे यांच्याशी सिंचनप्रश्नी चर्चा करताना पश्चिम पट्ट्यातील शिष्टमंडळ.

# हरणबारी कालवा, केळझर चारीचे काम सुरू करावे

## दुष्काळी पश्चिम पट्ट्यातील शिष्टमंडळाचे निवेदन

**सकाळ वृत्तसेवा**

अंबासन, ता. ६ : हरणबारी उजवा कालवा व केळझर चारी क्रमांक आठसाठी पूरपाणी आरक्षित करून काम सुरू करावे या मागणीसाठी पश्चिम पट्ट्यातील शिष्टमंडळाने केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, पालकमंत्री गिरीश महाराज, आमदार सीमा हिरे यांच्याशी नाशिकला येथे चर्चा केली.

उजवा कालवा व चारी क्रमांक आठच्या रखडलेल्या कामाची पूर्तता करून पूरपाणी आरक्षित करावे या मागणीसाठी आमदार सीमा हिरे यांनी पूरपाणी आरक्षणाचा मुद्दा अधिवेशनात मांडावा ही मागणी हरणबारी उजवा कालवा कृती समिती व सुजाण शेतकरी गटाच्या माध्यमातून करण्यात आली. दुंधे (ता. मालेगाव) येथील धरण ३० ते ४० वर्षांपासून कोरडे आहे. यात हरणबारी उजवा कालवा व केळझर चारी क्रमांक आठचे पूरपाणी पडल्यास वीसपेक्षा जास्त गावांचा पिण्याच्या पाणीप्रश्न निकाली निघणार आहे. हरणबारी उजवा कालवा व चारी क्रमांक आठचे लवकरच काम सुरू करण्यात येईल व शासनाकडून आणून देण्याचे आश्वासन पालकमंत्री गिरीश महाजनांनी शिष्टमंडळास दिले. तसेच दुंधे गावासाठी मुख्यमंत्री पाणीपुरवठा योजनेंतर्गत लेंडीनाला धरण पाइपलाइन लवकरच मंजुरी मिळवून काम सुरू करण्याचे जिल्हा परिषद अधिकाऱ्यांना श्री. महाजन यांनी आदेश दिले.

शिष्टमंडळात सुजाण नागरिक मंचाचे मधुकर बागूल, किशोर ह्याळीज, दिनेश देसले, प्रवीण शिंदे, संदीप आहिरे, मोठाभाऊ वाघ, किरण सोनवणे, केवळ आहिरे, कैलास आहिरे, समाधान आहिरे, विकास सोनवणे, नामदेव जाधव, मुरलीधर वाघ सहभागी झाले होते.